# स्तेफन, आत्म्याने परिपूर्ण मनुष्य

पवित्र आत्म्याला आमच्यात बदल करून मार्गदर्शन करू द्या

मुलांना शिकवणाऱ्यांनी H5b हा अभ्यास क्रम वाचावा.



**प्रार्थना** पवित्र आत्म्याला तुमच्या मनाचे नवीकरण करण्याची तसेच तुम्हांला अधिक ख्रिस्तासारखे करण्याची विनंती करा.

**पार्श्वभूमी** योहान 14-16 ह्या अध्यायात येशूने सांगितले की तो स्वर्गात गेल्यावर तो त्याची जागा घेण्यासाठी कैवारी पाठवणार आहे. येशूला होते तसे पवित्र आत्म्याल्या भौतिक शरीर नाही. पवित्र आत्मा आमच्या ठायी राहतो (1 करिंथ 6:19 व योहान 14:17) तो कोठे आहे? तुमच्या ठायी! तो तुम्हांला मार्गदर्शन करतो तुम्ही इतरांना शिकवता तेव्हा तुम्हांला सहाय्य करतो. तो तुम्हांला योग्य काय आणि अयोग्य काय ते दाखतो (योहान (16:8-13)

## 1. पवित्र आत्म्याला आपल्या मध्ये कार्य करू द्या. हे स्तेफनकडून शिका

**प्रे. कृ. 6:1-7** ह्या वचनांत स्तेफन यरूशलेम मधील मंडळीत काय काम करीत होता ते पाहा.

**प्रे. कृ. 6:3** ह्या वचनात ते अशा प्रकारच्या कामासाठी कोणत्या माणसांची निवड करीत ते पाहा.

**प्रे. कृ. 6:8-16** ह्या वचनात स्तेफन च्या विरूद्ध कोणत्या लोकांनी साक्ष दिली ते पाहा.

स्तेफनच्या संदेशात इस्राएलाच्या इतिहासाचा प्रवाह **प्रे. कृ. 7** मध्ये लक्षात घ्या.

**प्रे. कृ. 7:57-59** ह्या वचनांत पुढाऱ्यांनी स्तेफनच्या बोलण्यावर कशी प्रतिक्रिया व्यक्त केली ते पाहा.

**प्रे. कृ. 7:60** ह्या वचनात स्तेफनने त्यांचा राग व जुलूम याचा कसा प्रतिकार केला ते पाहा.

ख्रिस्तावर विश्वास ठेवणाऱ्या आमच्यासाठी पवित्र आत्मा आठ गोष्टी करतो त्या पाहा:

1) **योहान 14:26**, मध्ये तो आम्हांला शिकण्यास कशी मदत करतो.

2) **योहान 16:8** मध्ये तो आमच्या विषयी आम्हांला काय सांगतो.

3) **प्रे. कृ. 1:8** मध्ये तो आम्हांला काय करएण्यास सामर्थ्य देतो.

4) **रोम 8:11-14** मध्ये तो आमच्यासाठी काय करतो.

5) **रोम 8:15-17** मध्ये तो आम्हांला कशाची खात्री देतो.

6) **इफिस 1:13-14** मध्ये तो आमच्या सार्वकालिक तारणाची कशी खात्री देतो.

7) **1 करिंथ 12:1-12** मध्ये तो आम्हांला सेवेसाठी कशा प्रकारे तयार करतो,

8) **1 करिंथ 12:13** मध्ये तो आम्हांला कायम स्वरूपी कोठे ठेवतो.

*(उत्तरे:*

*1) पवित्र आत्मा आम्हांला सर्व गोष्टी शिकवतो (आमच्या मनांना प्रकाश दाखवतो)*

*2) तो आमच्या पापाची आम्हांला खात्री पटवून देतो.*

*3) तो ख्रिस्तासाठी प्रभावी साक्ष देण्याकरीता आम्हांला सामर्थ्य देतो.*

*4) तो आम्हांला नवे, पवित्र जीवन देतो (पुन्हा जन्मणे, नवा जन्म देवामध्ये पवित्र जीवन)*

*5) तो आम्ही देवाची मुले आणि ख्रिस्ताबरोबर स्वर्गीय समृद्धीचे वारिस आहोत याची आम्हांला खात्री देतो.*

*6) तो आमच्यावर मोहोर उमटवतो आमच्या स्वर्गीय वारशाची आम्हांला हमी देतो.*

*7) तो ख्रिस्ताच्या सर्वव्यापी शरीररूपी मंडळीत आमचा बाप्तिस्मा करतो.*

*8) तो शरीररूपी मंडळीच्या उन्नतीसाठी आम्हांला निरनिराळी आध्यात्मिक दाने देतो.)*

**2. सहकाऱ्यांशी चर्चा करून वि श्वासणाऱ्यांनी पुढच्या आठवडयात काय करायचे त्याची योजना आखा.**

- आपल्याला खरोखर पवित्र आत्मा मिळाला आहे याची खात्री नसाणाऱ्या विश्वासणाऱ्यांची जाऊन भेट घ्या त्यांच्यासाठी प्रार्थना करा आणि त्यांनाही पवित्र आत्मा मिळावा यासाठी प्रार्थना करण्यास सांगा.
- समजा एखादया व्यक्तीला अद्याप पवित्र आत्म्याचे कार्य समजले नसेल तर त्यांना वर दिलेल्या आठ गोष्टी चे साविस्तर स्पष्टिकरण करून तो आमच्यासाठी काय करतो ते सांगा.

**3. सहकाऱ्यांशी चर्चा करून येणाऱ्या उपासनेच्या वेळेची योजना आखा.**

गरजा आणि स्यानिक रिवाज ह्यांना अनुरूप अशा कृती करा.

पवित्र आत्म्याने आमच्या मध्ये बदल करावा आणि आम्हांला प्रामाणिक विश्वासू सेवक करावे यासाठी उपासने मध्ये प्रार्थना करा.


मागच्या आठवडयात पवित्र आत्म्याकडून लोकांना मिळालेले यश व आरोग्य यासाठी देवाची स्तुती करा.

आत्म्याच्या फळांविषयी बोला किंवा गीत गा पवित्र आत्म्याच्या द्वारे आमच्या ठायी पवित्रतेचे नऊ गुण निर्माण होतात हे नऊ गुण एकत्र गुंफणारी एखादी कविता मंडळीतील एखादया सर्जनशील कलाकार व्यक्तीला लिहिण्यास सांगा हे गुण गलती 5:22-23 ह्या वचनांत पहायला मिळतात. ही कविता विश्वासणाऱ्यांना सुरात गाता यावी यासाठी तिला एखादी लोकप्रिय चाल लावा.

स्तेफनची गोष्ट सांगा, मुले याचे नंतर नाटर्याकरण करतील.

प्रे. कृ. 6 व 7 ह्यामधील (भाग 1 मधून) मुद्यांविषयी विश्वासाणाऱ्यांना प्रश्न विचारा

**पवित्र आत्मा आमची अंत:** करणे कशी बदलून टाकतो हे सप्रमाण दाखवा. दोन प्रौढांना शोधक आणि रखवालदार ह्या भूमिका करण्यास सांगा शोधक आपल्या शर्टवर पुढे एक सापाचे चित्र अडकवतो (पुढे दिलेले चित्र जाड कागदावर काढून ते हदयाच्या आकारात कापा)



**रखवालदार:** (एका बाजूला उभे राहा आणि मोठया आवाजात बोला)

**शोधक:** रखवालदाराच्या दिशेने चालत जातो. प्रत्येकाला छातीवर अडकवलेला साप दिसला पाहिजे. मोठयाने म्हणा, ''रखवालदार दादा कृपा करून मला स्वर्गच्या राज्यात आत जाऊ द्याना''

**रखवालदार:** "शोधक भाऊ तुमच्या अंत: करणातील ही दुष्ट गोष्ट घेऊन तुम्हांला आत जाता येणार नाही."

**शोधक:** ''पण मला माझी पातके माझ्या अंत: करणातून कशी बाहेर काढता येतील?''

**रखवालदार:** (मोठया आवाजात 1 योहान 1:7-9 ही वचने वाचा)

**शोधक:** ''मी माझी पातके कबूल करतो आणि येशूला माझी क्षमा करण्याची विनती करतो.''(सापाकडे बोट दाखवा ''पण माझ्या अंतरंगातील ही वाईट गोष्ट मला कशी काढून टाकता येईल?''

**रखवालदार:** ''तुझ्या पातकांची क्षमा झालेली असली तरी, सैतानाच्या, जुन्या सापाच्या मागे जाण्याची इच्छा अद्याप मनात ठेवून तुला स्वर्गात येता येणार नाही. दुष्टपणाच्या नुसत्या विचारालाही देव स्वर्गात थारा देणार नाही तू पवित्र आत्म्याला तुझे अंत: करण बदलू देणे अगत्याचे आहे'' (वाचा गलती 5:16-24)

**शोधक:** ''रखवालदार दादा, मी येशूला माझी पातके त्याच्या रक्ताने धुण्याची विनंती केली, आता, माझा जुना पातकी स्वभाव वधस्तंभावर खिळून त्या जागी प्रीती व चांगुलपणा ह्या गोष्टी निर्माण करण्यास पवित्र आत्म्याने मला सहाय्य केले आहे.'' (छातीवरील सापाचे चित्र काढून फेकून द्या.)

**रखवालदार:** ''चला, या स्वर्गाच्या राज्यात, आत या!''

**पाठ करा योहान 14:15-16**

मुलांना, त्यांनी स्तेफनच्या विषयी तयार केलेली त्यांची नाटिका सादर करण्यास सांगा तसेच त्यांनी तयार केलेले प्रश्न विचारा.

पवित्र आत्मा आमच्यासाठी करीत असलेल्या आठ गोष्टीच्या यादीवर चर्चा करा (भाग 1 मधून)

येशूने तो मरण पावण्याच्या आधीच्या रात्री शिष्यांना सोडून जात असल्याची वाईट बातमी सांगितली याचे स्पष्टीकरण करा. मग विचारा, ''तुम्हांला अत्यंत प्रिय असणारी व्यक्ती तुम्हांला सोडून जाते तेव्हा तुम्हांला काय वाटते?''

येशूची पवित्र आत्म्या बरोबर असलेली समपता हे रहस्य स्पष्ट करून सांगा. वाचा 14:15-17

- येशूने त्यांना सांगितले की तो त्यांना एकटे सोडणार नाही. तो कैवारी पाठवून देणार आहे.
- येशने अभिवचन दिले, ''मी तुम्हांला अनाथ असे सोडणार नाही मी तुम्हांकडे येईन'' (योहान 14:18)
- वाचा योहान 16:13-15 येशूने योहान 10:30 मध्ये म्हटले, ''मी आणि पिता एक आहो.'' त्याने असेही म्हटले असावे ''मी आणि पवित्र आत्मा एक आहो.'' देव जो पिता देव जो पुत्र आणि देव जो पवित्र आत्मा ही तीन वेगवेगळी व्यक्तीत्वे असली तरी त्यांचे सारतत्व एक आहे, ती एकाच देवामध्ये त्रैकत्वामध्ये एकवटलेली आहेत.

**प्रभु भोजनाची ओळख करून** देण्यासाठी, जुन्या करारातील याजक समक्षतेची पवित्र भाकर निवासमंडपात देवासमोर मेजावर ठेवत असे (निर्गम 25:30) हे स्पष्ट करून सांगा आता आपण देवाच्या समक्षते मध्ये भाकरीचे सेवन करणार आहोत आणि पुढे स्वर्गात ''कोकफ्रयाच्या लग्नाच्या मेजवानीच्या वेळीही'' आपण असेच करणार आहोत.

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net